बुधवार दि. २४ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मनपा इतिहासातील सर्वांत मोठी कारवाई

# १४७ अतिक्रमणांवर बुलडोझर

### शहर विकासासाठी आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत







**जालना -प्रतिनिधी**

जालना शहराला अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी जालना महानगरपालिका प्रशासनाने सुरू केलेली धडक अतिक्रमण हटाव मोहीम आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून, मंठा चौफुली परिसरात करण्यात आलेली कारवाई ही जालना शहराच्या इतिहासातील सर्वात मोठी अतिक्रमणविरोधी कारवाई मानली जात आहे. या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून सार्वजनिक जागांवर बेकायदेशीररीत्या कब्जा करून बसलेल्या अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या स्पष्ट आणि कठोर भूमिकेमुळे शहरातील अतिक्रमणांविरोधात प्रशासनाने बुलडोझर मोहीम सुरू केली असून, यामुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून रस्ते, नाले, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे करून वाहतूक कोंडी, अपघात आणि नागरिकांच्या हालअपेष्टा वाढविणाऱ्या घटकांविरोधात प्रशासनाने घेतलेली ही कारवाई कौतुकास्पद मानली जात आहे.

**नोटिसा देऊनही अतिक्रमण कायम; अखेर प्रशासनाचा दणका**

गेल्या अनेक वर्षांपासून मंठा चौफुली परिसरातील अतिक्रमणधारकांना वेळोवेळी नोटिसा देण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी तात्पुरती कारवाईही करण्यात आली होती. मात्र, कारवाईनंतर पुन्हा अतिक्रमणे उभी राहत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत होती. अखेर मनपा प्रशासनाने कठोर भूमिका घेत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटाव मोहीम राबविली.

त्र्यंबक कांबळे, उपायुक्त तथा विजय फुलंब्रीकर, सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मंठा चौफुली ते न्हावा रोड या मार्गावरील दोन्ही बाजूंना असलेली तब्बल १४७ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

**शहर विकासासाठी कठोर निर्णय आवश्यक**

शहरातील रस्ते अरुंद होणे, वाहतूक कोंडी, पावसाळ्यात नाल्यांमधील अडथळे, पाणी साचणे आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होण्यामागे अतिक्रमणे हे प्रमुख कारण मानले जाते. त्यामुळे शहर विकासासाठी प्रशासनाला कठोर निर्णय घ्यावे लागतात.

मनपा आयुक्तांनी घेतलेले हे पाऊल शहराच्या भविष्यासाठी महत्त्वाचे असून, यामुळे रस्ते मोकळे होणार, वाहतुकीला गती मिळणार आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शहरातील इतर भागांमध्येही अशीच धडक कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**अतिक्रमणधारकांनी स्वतः पुढाकार घ्यावा**

महानगरपालिकेमार्फत संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा देण्यात येत आहेत. त्यामुळे रस्ते, नाले, नाल्या आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे संबंधितांनी स्वतःहून काढून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.नागरिकांच्या कराच्या पैशातून उभारलेल्या सार्वजनिक सुविधांवर अतिक्रमण करून शहराचा विकास रोखण्याचा कोणालाही अधिकार नाही. त्यामुळे अतिक्रमणधारकांनी प्रशासनाच्या कारवाईची वाट न पाहता स्वखर्चाने अतिक्रमणे हटविणे हीच जबाबदार नागरिक म्हणून त्यांची भूमिका ठरेल.

**पुन्हा अतिक्रमण केल्यास कठोर कारवाईचा इशारा**

महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, अतिक्रमण निष्कासित केल्यानंतर संबंधितांनी पुन्हा अतिक्रमण केल्यास त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. आवश्यक असल्यास दंडात्मक कारवाई, गुन्हे दाखल करणे आणि पुन्हा अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे.

**नागरिकांकडून आयुक्तांच्या निर्णयाचे स्वागत**

शहरातील अनेक सामाजिक संस्था, व्यापारी, वाहनचालक आणि नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून, जालना शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मनपा आयुक्तांनी सुरू केलेली मोहीम संपूर्ण शहरभर राबविण्याची मागणी होत आहे. आजपर्यंत अनेक प्रशासनांनी अतिक्रमणांविरोधात मोहिमा राबवल्या; मात्र त्यात सातत्याचा अभाव होता. यावेळी मनपा प्रशासनाने दाखविलेली इच्छाशक्ती आणि कठोरता कायम राहिली तर जालना शहर खऱ्या अर्थाने अतिक्रमणमुक्त होऊन सुबक, सुरक्षित आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करणारे शहर म्हणून ओळखले जाईल.

## जागतिक संगीत दिनी जालन्यात रंगली तरन्नुमची सुरेल मैफल; रसिक मंत्रमुग्ध

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून तरन्नुम संगीत समूहातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कराओके गीतांच्या भव्य मैफिलीने जालनेकर रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. सुमारे दीडशेहून अधिक संगीतप्रेमींच्या उपस्थितीत पार पडलेला हा कार्यक्रम सुरेल आणि अविस्मरणीय आठवणींचा मेळा ठरला.

कमलकिशोर झुनझुनवाला यांच्यासह डॉ. विजय गजेंद्रगडकर, सौ. राजलक्ष्मीजी नानावटी, प्रकाश कुंडलकर आणि विजयकुमार शिंदे यांनी संगीतप्रेमींना गायनाचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने तीन वर्षांपूर्वी तरन्नुम या संगीत समूहाची स्थापना केली. कमलकिशोर झुनझुनवाला यांच्या संकल्पनेतून आतापर्यंत आयोजित दोन संगीत मैफिलीच्या कार्यक्रमात नवोदित गायकांनी गायनकलेची जोपासना केली. २१ जून या जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून येथील मधुर बँक्वेट हॉलमध्ये तरन्नुम संगीत मैफल पार पडली. त्यात ६ दुकल गीते, २३ एकल गीते




आणि हार्मोनिकावरील एका विशेष सादरीकरणासह एकूण ३० विविध प्रकारच्या गाण्यांचा समावेश होता. नवोदित आणि हौशी गायकांनी मोहम्मद रफी, लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरकुमार आणि मुकेश यांची अजरामर गाणी उत्कृष्ट सादरीकरणासह सादर केली. प्रत्येक (पान २ वर)

**हौशी गायकांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उद्देश- झुनझुनवाला**

जालन्यातील संगीतप्रेमी आणि हौशी गायकांना आपल्यातील सुप्त कला गुणांचे सादरीकरण करता यावे, यासाठी तीन वर्षांपूर्वी तरन्नुम समूहाची स्थापना करण्यात आली. नवोदित गायकांनी घेतलेली मेहनत आणि जालनाकर रसिकांचा मिळणारा वाढता प्रतिसाद, या कार्यक्रमाची प्रतीक्षा करणारे रसिक पाहता हा संगीत प्रवास यापुढेही अधिक उत्साहाने सुरू राहील. संगीत हे जीवनातील ताणतणाव दूर करून आनंद देणारे माध्यम आहे, हाच आनंद आम्हाला या मंचावरून वाटायचा आहे, असे तरन्नुम संगीत समूहाचे संस्थापक कमलकिशोर झुनझुनवाला म्हणाले.

## मुंबईतील मोर्चात जालना जिल्ह्यातील दोन हजार मातंग समाज बांधव सहभागी होणार!

### आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी

**जालना - प्रतिनिधी**

मातंग समाजातील भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी आधुनिक लहुजी सेनेच्या संस्थापक अध्यक्षा नगीनाताई कांबळे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. तथापि सचिन साठे यांच्या नेतृत्वाखाली उद्या मुंबईत होणाऱ्या विराट मोर्चात सहभागी होण्यासाठी जालना



जिल्ह्यातील २००० मातंग समाज बांधव रवाना झाले आहेत.

मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ आयोजित या पत्रकार परिषदेस आधुनिक लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण क्षीरसागर, प्रदेश समन्वयक अंकुश एगंड, मराठवाडा अध्यक्ष संतोष तुपसौंदर, जिल्हाध्यक्ष राम सुतार, सामाजिक नेते शिवाजी घुले,रविकांत जगधने आदींची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना नगीनाताई कांबळे यांनी सांगितले की, ७० वर्षात मातंग समाजाला शिक्षणाच्या अभावामुळे शैक्षणिक व नोकरीविषयक लाभापासून वंचित राहावे लागले, याचा फायदा अनुसूचित जातीतील काही समाज घटकांना झाला. अलिकडच्या काळात शिक्षणाची महती कळाल्याने मातंग समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. अनेक मुले पदवी व त्या पुढील शिक्षण घेत आहेत.अनुसूचित जातीचे आरक्षण उपवर्गीकरण नसल्याने (पान २ वर)

## कागदोपत्री वृक्षलागवड, प्रत्यक्षात उजाड रस्ते

### विधानसभेत आमदार बबनराव लोणीकर यांची लक्षवेधी; वृक्षलागवड घोटाळ्याच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**मुंबई / जालना -प्रतिनिधी**

''झाडे लावा झाडे जगवा'' योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील घनसावंगी, मंठा आणि परतूर तालुक्यात कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात अनेक रस्त्यांवर एकही झाड अस्तित्वात नसल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची दखल घेत परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

आमदार बबनराव लोणीकर यांनी या प्रकरणाला ''पर्यावरणाच्या नावाखाली जनतेच्या पैशांची लूट'' असे संबोधत संपूर्ण प्रकरणाची एसीबी, ईओडब्ल्यू किंवा विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, घनसावंगी, मंठा आणि परतूर तालुक्यातील विविध राज्य व प्रमुख जिल्हा मार्गांवर प्रत्यक्ष पाहणी केली असता वृक्षलागवडीचे कोणतेही अस्तित्व आढळून आले नाही.

ज्या रस्त्यांवर हजारो झाडे लावल्याचे दाखविण्यात आले, तेथे आजही उजाड परिस्थिती दिसून येत आहे. त्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा वापर नेमका कसा झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ''जर झाडे लावली असतील तर ती कुठे आहेत? झाडांचे संगोपन झाले असेल तर त्याचा पुरावा काय? आणि जर झाडेच नाहीत, तर कोट्यवधी रुपयांची देयके कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आली?'' असा सवालही आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात संबंधित विभागाचे अधिकारी, कामाची देखरेख करणारे कर्मचारी आणि कंत्राटदार यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मोजमाप पुस्तके (एमबी), देयकांची कागदपत्रे, छायाचित्र पुरावे, जीआयएस नोंदी आणि प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या आधारे संपूर्ण सत्य बाहेर आणावे, असे त्यांनी म्हटले आहे. ''पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली जर सार्वजनिक निधीची उधळपट्टी अथवा गैरव्यवहार झाला असेल, तर दोषींना कोणतीही दया दाखवू नये.

चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल



करून शासनाच्या निधीची वसुली करण्यात यावी,'' अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, या प्रकरणामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची चिन्हे आहेत.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना यश; भूसंपादन प्रकरणातील १.३१ कोटींची रक्कम उच्च न्यायालयात जमा

### देवला येथील शेतकरी बांधवांकडून जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार



**जालना - प्रतिनिधी**

जालना, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या भूसंपादन व जप्ती प्रकरणात जालना जिल्हा प्रशासनाच्या पाठपुराव्यामुळे महत्त्वपूर्ण प्रगती झाली असून, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रयत्नांतून कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी रुपये १ कोटी ३१ लाख ९३ हजार ५६ इतकी रक्कम उच्च न्यायालयात जमा केली आहे. या कार्याबद्दल मौजे देवला, ता. परतूर येथील रामदास लाटे व शंकर लाटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित भूसंपादन व जप्ती प्रकरण अनेक वर्षांपासून न्यायप्रविष्ट होते. या प्रकरणात न्यायालयीन आदेशानुसार (पान २ वर)

# संपादकीय....

## पावसाची प्रतीक्षा आणि बळीराजाची परीक्षा

राज्यात मान्सूनचे आगमन झाले की शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होतात. यंदाही जूनच्या सुरुवातीला झालेल्या पावसाने जालन्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. अनेकांनी धाडसाने खरीप पेरण्या सुरू केल्या. कपाशी, सोयाबीन, तूर, मका यांसारख्या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली. मात्र काही दिवसांतच पावसाने अचानक विश्रांती घेतली आणि बळीराजाची आशा पुन्हा चिंतेत बदलली.

आज राज्यातील बहुतांश भागात शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. ढग येतात, अंदाज व्यक्त होतात, पण पाऊस पडत नाही. या अनिश्चिततेमुळे केवळ पिकेच संकटात आलेली नाहीत, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच धोक्यात आली आहे.

जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये कपाशीची उगवण झाली आहे; मात्र जमिनीतील ओलावा संपल्यामुळे रोपे करपू लागली आहेत. दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. शेतकरी पुन्हा बियाणे खरेदी करणार कसे? मशागतीचा खर्च पुन्हा कसा करणार? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे.

शेती ही आधीच निसर्गावर अवलंबून असलेली जोखमीची व्यवस्था आहे. त्यात बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, इंधन आणि शेती अवजारांच्या वाढत्या किंमतींनी शेतकऱ्यांची कंबर मोडली आहे. एका बाजूला उत्पन्नाची हमी नाही आणि दुसऱ्या बाजूला खर्च सतत वाढत आहे. परिणामी शेतकरी आर्थिक, मानसिक आणि सामाजिक दबावाखाली जात आहे. याहून गंभीर बाब म्हणजे हवामानातील वाढती अनिश्चितता. हवामान खात्याचे अंदाज अनेकदा बदलत आहेत किंवा स्थानिक पातळीवर ते तंतोतंत लागू होत नाहीत. शेतकरी त्या अंदाजांवर पेरणीचे नियोजन करतो; परंतु प्रत्यक्षात पाऊस न पडल्यास त्याचे नुकसान होते. त्यामुळे हवामान अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक स्तरावर उपयुक्त होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

दुसरीकडे भूगर्भातील पाण्याची पातळीही झपाट्याने खाली जात आहे. विहिरी, बोअरवेल आणि शेततळे यांच्यावर वाढलेला ताण भविष्यातील जलसंकटाचे संकेत देत आहे. आज ठिबक आणि तुषार सिंचन शेतकऱ्यांसाठी आधार ठरत असले तरी पाण्याचाच स्रोत आटत असेल तर ही व्यवस्था किती दिवस टिकणार, हा प्रश्न आहे.

सरकारने दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला असला तरी सध्याच्या परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांना तो अपुरा वाटत आहे. दुबार पेरणी, वाढलेला उत्पादन खर्च आणि संभाव्य नुकसान लक्षात घेता अतिरिक्त मदत, पीकविमा भरपाई, बियाणे अनुदान आणि तातडीच्या आर्थिक सहाय्याची गरज आहे.

या संकटाकडे केवळ शेतीचा प्रश्न म्हणून पाहता येणार नाही. शेती अडचणीत आली की ग्रामीण बाजारपेठा मंदावतात, मजुरांचे रोजगार कमी होतात, वाहतूक आणि कृषी व्यवसायावर परिणाम होतो. त्यामुळे हा प्रश्न संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आहे. आज गरज आहे ती तातडीच्या उपाययोजनांची आणि दीर्घकालीन धोरणांची. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, हवामान सल्ला प्रणाली, पीक विविधीकरण आणि शेतीला स्थैर्य देणारी धोरणे यावर भर देणे आवश्यक आहे. शेतकरी केवळ कर्जमाफीची अपेक्षा करत नाही; तो सुरक्षित आणि शाश्वत शेतीव्यवस्थेची अपेक्षा करतो. त्याला योग्य दर, योग्य पाऊस आणि योग्य धोरणांची गरज आहे.

सध्या मात्र जालन्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील बळीराजाच्या नजरा आकाशाकडे खिळल्या आहेत. ढग जमतील, पाऊस येईल आणि पुन्हा हिरवाई फुलेल, या आशेवर तो उभा आहे. कारण शेवटी शेतकऱ्याची खरी ताकद ही त्याची आशा आणि जिद्दच असते. मात्र ही आशा कायम ठेवण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी संवेदनशीलतेने पुढे येण्याची गरज आहे.

# सहकार, साखर आणि सत्ता समीकरणे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा इचलकरंजी दौरा सहकाराच्या चौकटीपलीकडे जात पश्चिम महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा संकेत देणारा ठरला. सहकार, साखर आणि वस्त्रोद्योगाच्या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या दौऱ्यातून भाजपने सहकार क्षेत्रातील आपली पकड मजबूत करण्याचा संदेश दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचा नुकताच झालेला इचलकरंजी दौरा हा केवळ एका सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनापुरता किंवा कारखान्याच्या नामविस्ताराच्या कार्यक्रमापुरता मर्यादित राहिला नाही. दौऱ्यापूर्वी या भेटीकडे सहकार क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न, साखर उद्योगाच्या अपेक्षा आणि वस्त्रोद्योगाला मिळू शकणाऱ्या संभाव्य दिलाशाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात होते. मात्र, कार्यक्रमानंतर शहा यांच्या भाषणातील मुद्दे आणि त्यातून देण्यात आलेल्या राजकीय संदेशामुळे पश्चिम महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. इचलकरंजी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन मुख्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त राज्यभरातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे पदाधिकारी तसेच भाजपचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिले.

काल जोर का झटका लगा, यानंतर आणखी झटके लागणार! विधानसभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल; प्रश्न विचारून पळ काढणाऱ्यांनी आम्हाला शिकवू नये मुंबई : या निमित्ताने शहरी सहकारी बँकांच्या संचालकांच्या कार्यकाळावरील निर्बंध, डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि नियामक अडचणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, शाह यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू केवळ सहकार क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणावर भाष्य करतानाच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा, घुसखोरी आणि विरोधी पक्षांच्या राजकारणावरही थेट भूमिका मांडली. ''भारत ही काही धर्मशाळा नाही,'' असे म्हणत त्यांनी काँग्रेस तसेच उद्धव ठाकरे



यांच्या नेतृत्वावर अधिक तीव्र शब्दांत टीका केली.या वक्तव्याचे राजकीय विश्लेषण करताना एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक ठरते. पश्चिम महाराष्ट्र हा राज्याच्या राजकारणात नेहमीच प्रभावशाली प्रदेश राहिला असून, विशेषतः सहकार चळवळीचा तो पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी पतसंस्था आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून येथील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेची घडी अनेक दशकांपासून बसलेली आहे. या सहकार व्यवस्थेवर दीर्घकाळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसशी संबंधित नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीत भाजपने सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून सहकारी संस्थांमध्ये अधिक सक्रिय सहभाग वाढवणे, नव्या नेतृत्वाला संधी देणे आणि पारंपरिक राजकीय समीकरणांना आव्हान देण्याचा प्रयत्न भाजपकडून होत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील हालचालींना सध्या विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. इचलकरंजीची निवडही याच व्यापक राजकीय रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असलेल्या या शहराचा सहकार क्षेत्राशीही मोठा संबंध आहे. इचलकरंजीतून दिलेला राजकीय संदेश केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित राहत नाही, तर कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांपर्यंत त्याचा प्रभाव जाणवू शकतो. त्यामुळे या भागातील राजकीय पकड मजबूत करण्यासाठी भाजपकडून या दौऱ्याकडे संघटनात्मक विस्ताराची संधी म्हणून पाहिले जात आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच भविष्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात स्थान निर्माण करणे हे भाजपच्या राजकीय अजेंड्याचा महत्त्वाचा भाग असल्याचे दिसते. पारंपरिक सहकार राजकारणातील बदल, नव्या राजकीय समीकरणांची निर्मिती आणि ग्रामीण भागातील संघटन वाढवण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. दुसरीकडे, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांचे लक्ष या दौऱ्यातून काही ठोस निर्णय आणि तातडीच्या उपाययोजनांकडे लागले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सहकार क्षेत्रासाठी साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य देणारी मदत, ऊस उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सहकारी बँकांसमोरील नियामक व आर्थिक अडचणी, तसेच डिजिटल सुविधांचा विस्तार यासंदर्भात सकारात्मक घोषणा होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, दौऱ्यात मांडलेल्या विचारांमध्ये सहकार क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात व्यापक धोरणात्मक भूमिका दिसून आली असली तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने तातडीच्या निर्णयांची अपेक्षा असलेल्या घटकांना काही प्रमाणात निराशा जाणवली. सहकारी संस्थांना भेडसावणाऱ्या रोजच्या अडचणी, शेतकरी आणि कारखानदारांसमोरील आर्थिक प्रश्न, तसेच सहकारी बँकांच्या कामकाजातील अडथळ्यांवर ठोस घोषणा न झाल्याची भावना काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर इचलकरंजी दौऱ्याचे राजकीय आणि सामाजिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

दौऱ्यापूर्वी सहकार, उद्योग आणि विकास हे प्रमुख मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी होते; मात्र दौऱ्यानंतर राजकीय संदेश, विचारधारा आणि सहकाराच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या नव्या समीकरणांवर अधिक चर्चा सुरू झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रावर दीर्घकाळ प्रभाव असलेल्या पारंपरिक राजकीय नेतृत्वाला पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून या दौऱ्याकडे पाहिले जात आहे. सहकारी संस्था, साखर कारखाने, बँका आणि स्थानिक नेतृत्व यांच्यामध्ये नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करण्याची रणनीती या दौऱ्यातून अधिक स्पष्ट झाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. भाजपकडून सहकार क्षेत्राला केवळ आर्थिक किंवा प्रशासकीय विषय म्हणून न पाहता, त्याला राजकीय विस्ताराचे माध्यम म्हणून वापरण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसून येते. मात्र, हा प्रयत्न प्रत्यक्षात कितपत यशस्वी होईल, हे आगामी काळात सहकारी संस्थांमधील निर्णय, स्थानिक नेतृत्वाची भूमिका आणि शेतकरी वर्गाचा प्रतिसाद यावर अवलंबून राहणार आहे.

# पाऊस लांबला; बळीराजाची चिंता वाढली

यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. अल निनोमुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे. सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो. देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही. याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले. बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# तुकाराम गाथा

भारतीय संस्कृती जोपासण्यासाठी संतांनी आपल्या त्यागातून संस्कृती जपली, वाढवली ती समृद्ध केली.संत तुकाराम महाराजांच्या साहित्यांची चारशेहून अधिक वर्षांनंतरही संत तुकाराम महाराजांनी लिहीलेल्या गाथा आताच्या मानवजातीला तारक आहेत.संत तुकाराम महाराजांच्या साहित्यांची आठवण सातत्याने होत आहे याच कारण आय ए एस अधिकारी तुकाराम मुंढे.मुंढे यांचे नाव तुकाराम असल्याने कदाचित त्यांच्या बदल्यांची मालिका सुरू झाली.२५ वेळा बदली होते.याच्या मागचे शास्त्र ते जेथे जेथे बदली होते त्या खात्याच्या अधिनियम, नियम यांचे तंतोतंत पालन करतात.बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांना ते सामोरे जातात.त्यामुळेच ते धडाडीचे अधिकारी म्हणून प्रसिद्ध झाले.महाराष्ट्रात किमान १०० आय ए एस अधिकारी आहेत असे गृहीत धरले तर , मुंढे एकटेच समाजातील भ्रष्ट कृती विरोधी कारवाई करतात.९९ जनांच्या कार्यक्षेत्रात सर्वकाही आनंदी आनंद आहे का ? की ते भ्रष्ट कृतीला पाठबळ देतात अशी शंका येते.महाराष्ट्रातील , देशातील भ्रष्टाचार निर्मूलन करणे आय ए एस ,आय पी एस अधिकार्यांच्या अधिकारात आहे.देशातील सामान्य नागरिकांना न्याय देणे या दोन शाखांच्या कार्यक्षेत्रात आहे.राजकीय दबाव झुगारून आपल्या अधिकाराचा वापर करावा.तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त झाल्यापासून महाराष्ट्रातील दोन्ही खात्यातील गैरकारभार करणार्या प्रवृत्तींना धडा शिकवला आहे.आता, नागरिकांना खात्री झाली पुन्हा त्यांची तीन वर्षे बदली होऊ नये म्हणून पुढे आले आहेत.मुंढे यांनी त्यांच्या अधिकारी पदांची गाथा निर्माण झाली आहे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**
**mahadeogolvaskar@gmail.com**

## पान १ व ४ वरुन...

### जागतिक संगीत...

गायकाने घेतलेली मेहनत आणि योग्य गाण्यांची निवड यामुळे संपूर्ण कार्यक्रम कमालीचा रंगतदार झाला. सुरेख नियोजन आणि नीटनेटके व्यवस्थापन यामुळे रसिकांनी प्रत्येक गाण्याला भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे दीपप्रज्वलनाचा मान महिलांना देण्यात आला. सौ. सुलभा झुनझुनवाला, सौ. सुलभा कुलकर्णी, सौ. राजलक्ष्मी नानावटी, सौ. कुंडलकर, सौ. गजेंद्रगडकर आणि सौ. रायठठ्ठा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तरन्नुम संगीत समूह सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. तरन्नुमच्या बॅनरखाली अशा सुरेल मैफिलींचे आयोजन दरवर्षी व्हावे, अशी इच्छा उपस्थित संगीतप्रेमींनी शेवटी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय गजेंद्रगडकर आणि गजानन मापारी यांनी केले.

### मुंबईतील मोर्चात...

त्यांना नोकरीची संधी मिळत नाही, आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी आपल्या संघटनेसह इतर सामाजिक संघटनेने सातत्याने केली आहे. ०१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीसह अनुसूचित जमातीतील आरक्षण उपवर्गीकरण करावे, असा आदेश दिला व या आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी राज्य सरकारने करावी, अशा सूचना केल्या आहेत. दोन वर्षापासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची महाराष्ट्र राज्य शासनाकडून अंमलबजावणी झालेली नाही, आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे वंशज सामाजिक नेते सचिन साठे यांनी पुणे ते मुंबई लॉग मार्च काढला असून ते २४जून रोजी मुंबईत धडकणार आहेत, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी यानिमित्ताने विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले, या मोर्चात महाराष्ट्र राज्यातील मातंग व अनुसूचित जातीतील अनेक सामाजिक संघटना सहभागी होणार आहेत. राज्य शासनाने मातंग समाजातील भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही कांबळे यांनी यावेळी केली. दरम्यान, रविकांत जगधने, अंकुश यंगड, शिवाजी घुले, लक्ष्मण क्षीरसागर यांनीही अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाची मातंग समाजाला नितांत गरज असल्याचे सांगितले. यावेळी सचिन क्षीरसागर,अंकुश राजगिरे,विनोद आठवे, गणपत कांबळे, कैलास जाधव, किरण शिरसाट, ललित कुचेकर, संतोष निकाळजे, रवी पाखरे, संतोष घोडे, गंगाधर लाखे, शंकर हिवाळे, राजू निकाळजे ,दशरथ थोरात, आदींची उपस्थिती होती.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या...

आवश्यक रक्कम जमा करण्याची प्रक्रिया रखडलेली होती. मात्र जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांशी सातत्याने समन्वय साधून आवश्यक कार्यवाही केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जालना पाटबंधारे विभागाने आवश्यक निधीची पूर्तता करून एकूण रु.१,३१,९३,०५६ इतकी रक्कम उच्च न्यायालयात जमा केली.

या निर्णयामुळे संबंधित जमीनधारकांना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून प्रकरण निकाली निघण्यासाठी महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेबद्दल परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर मौजे देवला येथील रामदास लाटे व शंकर लाटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच संबंधित प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून न्यायालयीन प्रक्रियेला गती दिल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

### समाज परिवर्तनात...

पर्यावरण, शिक्षण, आणि आरोग्य क्षेत्रात सर्व सदस्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे राबवलेल्या समाजोपयोगी उपक्रमांबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. मावळत्या सचिव राजनंदिनी राठौड यांनी वर्षभरात मिळालेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले व नूतन टीमला यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर नूतन अध्यक्ष आलोक नानावटी यांनी प्रास्ताविकात आगामी वर्षातील नियोजित उपक्रमांचा रोडमॅप मांडला. संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, शिक्षण क्षेत्राला मदत, गरजू रुग्णांसाठी आरोग्य शिबिरे आणि युवा सक्षमीकरणासाठी विविध रोजगारभिमुख कार्यशाळांचे आयोजन या प्रमुख क्षेत्रांवर विशेष भर देणार असल्याचे सांगून, दुर्गा माता मंदिरासमोरील रोटरी मिडटाऊन कक्ष्यालगत जॉगिंग ट्रॅक बनविण्याचा मनोदय व्यक्त केला. यावेळी नवीन सदस्यांचे सदस्यांचे रोटरीची अधिकृत पिन लावून अत्यंत उत्साहात स्वागत रोटरीसाठी निधी येणाऱ्यांचा श्री बारवाले यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिधी गोयल व धवल मिश्रीकोटकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार नूतन सचिव मनमोहन भक्कड यांनी मानले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ रोटरीयन फुलचंद भक्कड, रामकिशन मुंदडा, शिवपाल शर्मा, अरुण अग्रवाल, सुरेश अग्रवाल यांच्यासह नूतन कार्यकारणीचे सदस्य, रोटरी परिवारातील पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरसकट कर्जमाफीवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा; अन्यथा २९ जूनला मराठवाड्यात तीव्र शेतकरी आंदोलन

## आ. रोहित पवार यांचा सरकारला इशारा

**मुंबई - प्रतिनिधी**

विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी आ. रोहित पवार यांनी पंढरपूरच्या पवित्र भूमीत केलेल्या अन्नत्याग आंदोलनानंतर राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनाची अद्याप पूर्तता न झाल्याने त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेत कर्जमाफीच्या प्रश्नावर विधानसभेत सविस्तर चर्चा घडवून आणण्याची मागणी केली आहे.

पंढरपूर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान मंत्री गिरीश महाजन यांनी आ. रोहित पवार यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली होती. त्यावेळी अधिवेशनापूर्वी या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले; मात्र अद्यापही संबंधित बैठक आयोजित करण्यात आलेली नसल्याचे आ. रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले.



यासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेल्या निवेदनात आ. पवार यांनी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी हटविण्याबाबत सभागृहात व्यापक चर्चा घडवून आणण्याची विनंती केली. तसेच शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्वपक्षीय शिष्टमंडळाची तातडीने बैठक आयोजित करण्यासाठी शासनाला निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

या प्रस्तावित बैठकीसाठी आ. रोहित पवार यांच्यासह राजू शेट्टी, अजित नवले, शशिकांत शिंदे, हर्षवर्धन सपकाळ, अंबादास दानवे, सुधीर मुनगंटीवार, बच्चू कडू, जयंत पाटील (शेकाप), रघुनाथदादा पाटील, वामनराव चटप, रविकांत तुपकर, प्रवीणदादा गायकवाड, रविराज साबळे यांच्यासह विविध राजकीय पक्ष व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीबाबत सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास येत्या सोमवारी, २९ जून रोजी मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आ. रोहित पवार यांनी दिला असून सरकारने या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शिवसेना वर्धापन दिन व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वर्षपूर्तीनिमित्त शहरातील शाळेत शालेय साहित्य वाटप

**जालना - प्रतिनिधी**

शिवसेना वर्धापन दिन व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वर्षपूर्तीनिमित्त जालना शहरातील शाळेत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे व जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, महिला जिल्हाप्रमुख रुपम घुगे यांच्या मार्गदर्शनखाली शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी जुना जालना कचेरी रोडवरील महानगर पालिकेच्या शाळेत जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव,जेष्ठ विधिज्ञ ॲड.बलवंत नाईक, शहरप्रमुख दिपक रणनवरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख रुपमताई घुगे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद



पवार), अरविंद देशपांडे, अल्पसंख्याक शहरप्रमुख वसीम खान, उपशहरप्रमुख राजेश राऊत, संतोष क्षत्रिय, तुळशीराम काळे, शाळेतील शिक्षिका सविता गुळसकर, मयुरी मोताळे, पल्लवी कुलकर्णी, ज्योती जोशी यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांचा साहित्य वाटप करण्यात आले. नवीन जालना भागातील शिशु विहार, भोकरदन नाका येथील मराठा विद्यालय, भाग्यनगरातील सुरेखा प्राथमिक विद्यालय आदी शाळेत गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी व खऱ्या गरजवंताना हातभार लागावा, यासाठी शिवसेनेच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात येत असल्याचे सांगितले.

# माहोराजालना बस सेवेच्या एक वर्षपूर्तीनिमित्त चालक-वाहकांचा सत्कार

**राजुर - प्रतिनिधी**

जालना विभाग नियंत्रक कार्यालयाच्या अधिपत्याखाली जाफराबाद आगारातून सुरू असलेली माहोराजालना (मार्गे बरंजळा साबळे, नळणी खुर्द, जवखेडा ठोंबरे, केदारखेडा, राजूर) ही बस सेवा यशस्वीपणे एक वर्ष पूर्ण करून दुसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरलेल्या या बस सेवेने गेल्या वर्षभरात

परिसरातील प्रवाशांना नियमित, सुरक्षित आणि समाधानकारक सेवा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भोकरदन उपतालुकाप्रमुख अर्जुन पाटील -ठोंबरे यांनी जवखेडा गाव व परिसरातील नागरिक आणि



प्रवाशांच्या वतीने बस सेवेच्या एक वर्षपूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून बसचे वाहक एम. एस.

राठोड आणि चालक एन. एस. घायवट यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी गावचे सरपंच लक्ष्मणराव ठोंबरे यांच्यासह भगवानराव ठोंबरे,बबनराव ठोंबरे, शेषराव ठोंबरे, रामदास ठोंबरे, जनार्दन घोडे, अण्णा ठोंबरे, राजू ठोंबरे,योगेश ठोंबरे, सोनाजी ढवळे, रामराव ठोंबरे, नागरे, रावसाहेब डकले, गजानन ठोंबरे,संतोष ढवळे,शिवाजी ठोंबरे, अतुल ठोंबरे तसेच इतर ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी परिवहन महामंडळाच्या या जनहितकारी उपक्रमाचे कौतुक करत, ग्रामीण जनतेची जीवनवाहिनी ठरलेल्या या बस सेवेने भविष्यातही अशीच नियमित, सुरक्षित आणि समाधानकारक सेवा देत राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. गावकऱ्यांनी या सेवेबद्दल परिवहन महामंडळाचे मनःपूर्वक आभारही मानले.

# कोळेगाव येथे विश्वसेवा फाउंडेशनतर्फे 'एकल महिला दिन' उत्साहात साजरा

## मोफत साडी वाटपासह शासकीय योजनांची माहिती; ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी सामाजिक उपक्रम

**भोकरदन - प्रतिनिधी**

विश्वसेवा फाउंडेशनच्या वतीने दिनांक २३ जून २०२६ रोजी भोकरदन तालुक्यातील कोळेगाव येथे 'एकल महिला दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रामीण भागातील एकल महिलांना आधार, सन्मान आणि शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजातील एकल महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक आव्हानांचा सामना करत असताना त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व लाभ मिळणे आवश्यक आहे. याच उद्देशाने विश्वसेवा फाउंडेशनने हा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला.

यावेळी उपस्थित एकल महिलांना विश्वसेवा फाउंडेशनच्या वतीने मोफत



साडी वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे भाव पाहायला मिळाले. ग्रामीण भागातील गरजू महिलांना मदतीचा हात देत त्यांच्याप्रती सन्मान व्यक्त करण्याचा प्रयत्न संस्थेने केला.

कार्यक्रमादरम्यान महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची पात्रता, अर्ज करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, मिळणारे आर्थिक व इतर लाभ याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे अनेक महिलांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार दर्शविला.

कार्यक्रमात महिलांच्या आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन आणि आर्थिक सक्षमीकरणावरही विशेष भर देण्यात आला. महिलांनी स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, तसेच समाजात आत्मविश्वासाने वावरावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वसेवा फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी दादाराव गावंडे, विश्वसेवा फाउंडेशनचे पदाधिकारी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

ग्रामीण भागातील एकल महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरला असून, अशा उपक्रमांची भविष्यातही सातत्याने आवश्यकता असल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

महिलांनी व्यक्त केले समाधान

मोफत साडी वाटप, शासकीय योजनांची माहिती आणि विविध विषयांवरील मार्गदर्शन यामुळे उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये जागृती निर्माण होत असून, शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याबाबत आत्मविश्वास वाढत असल्याचे महिलांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, पनवेल (भिंगारी) ४१०२०६**

ई-मेल : panvel.ce@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक : ०२२-२७४५२७७८

**ई-निविदा सूचना क्रमांक ०९ सन २०२६-२७**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (Authority) आणि मुख्य अभियंता (कोकण) तथा प्रकल्प संचालक (बासप्र) यांचे वतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल (भिंगारी) (दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८) हे ''बहुपक्षीय विकास बँकांच्या आर्थिक सहाय्याने ईपीसी मोडद्वारे हाती घ्यावयाच्या महाराष्ट्र राज्यामधील सोबतच्या टीओआरच्या (TOR) संलग्न परिशिष्ट IV मध्ये नमूद केलेल्या पॅकेजेस नुसार विविध रस्त्यांचे पक्क्या बाजूपट्यांसह (Paved Shoulders) दोन पदरी काँक्रीट रस्ते तयार करण्यासाठी व्यवहार्यता अभ्यासासह डीपीआर (DPR), सर्वेक्षण आणि भू-नकाशा तयार करणे, ज्यामध्ये सामाजिक, पर्यावरणीय आणि सीसीए (CCA) शमन अभ्यासाचा समावेश आहे, पॅकेजे क्र. DPR Package 7 यासाठी सल्लागार सेवा नेमणे'' या कामांकरिता पात्र निविदाकारांकडून दि. २४.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ते दि.०१.०७.२०२६ पर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन पध्दतीने निविदा मागवित आहेत.

प्रस्तुत कामांची सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र (ईपीसी नमुन्यात) शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहू/डाउनलोड करु शकता. सविस्तर निविदा सूचना सा.बां. विभागाच्या www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ०१.०७.२०२६ (दुपारी १५ वाजेपर्यंत) असेल.

सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत / रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखीव ठेवलेले आहेत. सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०१.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) |
| स्पष्टीकरणासाठी तांत्रिक मुद्दे ऑनलाईनद्वारे उपस्थित करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२५.०६.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| निविदापूर्व बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण | मुख्य अभियंता (कोकण) व प्रकल्प संचालक (बासप्र) यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, बी-विंग, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१. दि.२५.०६.२०२६ दुपारी १२.०० वाजता (भारतीय वेळेनुसार) |
| निविदा प्रपत्र सेक्शन २, कलम ITB २१.१ नुसार हार्ड कॉपीमध्ये सादर करावयाचे दस्ताऐवजांचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण | निविदा पत्रकात नमुद केल्याप्रमाणे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात. दि.०३.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) (भारतीय वेळेनुसार) |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | दि.०३.०७.२०२६ (दुपारी १५.०० वाजता) (भारतीय वेळेनुसार) (अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, नवीमुंबई यांचे कार्यालय) |

**जा.क्र.काअ/पनवेल/निविदा/...**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सा.बां. विभाग, पनवेल**
**दिनांक : (फेर निविदा क्र.१)**

**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग,**
**पनवेल**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय क्रमांक आरोसी-२०२६-२७/क्र.-५/C १२६७ दि. २३-०६-२०२६


# मुंबईतील मोर्चात जालना जिल्ह्यातील दोन हजार मातंग समाज बांधव सहभागी होणार!

## आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी

**जालना -प्रतिनिधी**

मातंग समाजातील भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी आधुनिक लहुजी सेनेच्या संस्थापक अध्यक्षा नगीनाताई कांबळे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. तथापि सचिन साठे यांच्या नेतृत्वाखाली उद्या मुंबईत होणाऱ्या विराट मोर्चात सहभागी होण्यासाठी जालना जिल्ह्यातील २००० मातंग समाज बांधव रवाना झाले आहेत.

मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ आयोजित या पत्रकार परिषदेस आधुनिक लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण क्षीरसागर, प्रदेश समन्वयक अंकुश एगंड, मराठवाडा अध्यक्ष संतोष तुपसौंदर, जिल्हाध्यक्ष राम सुतार, सामाजिक नेते शिवाजी घुले,रविकांत जगधने आदींची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना नगीनाताई कांबळे यांनी सांगितले की, ७० वर्षात मातंग समाजाला शिक्षणाच्या अभावामुळे शैक्षणिक व नोकरीविषयक लाभापासून वंचित राहावे लागले, याचा फायदा अनुसूचित जातीतील काही समाज घटकांना झाला. अलिकडच्या काळात शिक्षणाची महती कळाल्याने मातंग समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. अनेक मुले पदवी व त्या पुढील शिक्षण घेत आहेत.अनुसूचित जातीचे आरक्षण उपवर्गीकरण नसल्याने त्यांना नोकरीची संधी मिळत नाही, आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी आपल्या संघटनेसह इतर सामाजिक संघटनेने सातत्याने केली आहे.

०१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीसह अनुसूचित जमातीतील आरक्षण उपवर्गीकरण करावे, असा आदेश दिला व या आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी राज्य सरकारने करावी, अशा सूचना केल्या आहेत. दोन वर्षापासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची महाराष्ट्र राज्य शासनाकडून अंमलबजावणी झालेली नाही, आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे वंशज सामाजिक नेते सचिन साठे यांनी पुणे ते मुंबई लॉग मार्च काढला असून ते २४जून रोजी मुंबईत धडकणार आहेत, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी यानिमित्ताने विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले, या मोर्चात महाराष्ट्र राज्यातील मातंग व अनुसूचित जातीतील अनेक सामाजिक संघटना सहभागी होणार आहेत. राज्य शासनाने मातंग समाजातील भावी पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आरक्षण उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही कांबळे यांनी यावेळी केली.

दरम्यान, रविकांत जगधने, अंकुश यंगड, शिवाजी घुले, लक्ष्मण क्षीरसागर यांनीही अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाची मातंग समाजाला नितांत गरज असल्याचे सांगितले. यावेळी सचिन क्षीरसागर,अंकुश राजगिरे,विनोद आठवे, गणपत कांबळे, कैलास जाधव, किरण शिरसाट, ललित कुचेकर, संतोष निकाळजे, रवी पाखरे, संतोष घोडे, गंगाधर लाखे, शंकर हिवाळे, राजू निकाळजे ,दशरथ थोरात, आदींची उपस्थिती होती.




**तहसिल कार्यालय भोकरदन**
**(एमएजी विभाग)**
**पत्ता - नवीन प्रशाकीय इमारत जालना रोड, भोकरदन जि. जालना**

दुरध्वणी (०२४८५)२४४४५१ दिनांक १२.०६,२७२६
ईमेल - bhokardantah@gmail.com
आ.क्र २०२६/एमएजी/जन्म /मृत्यू ३७२

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी, तथा तहसिलदार**
**भोकरदन यांचे न्यायालयात**

गजानन शंकर चव्हाण
विरुध्द
ग्रामसेवक ग्रा.प. पिंपळगांव कोलते ता. भोकरदन जि. जालना

ज्या अर्थी अर्जदार श्री. गजानन शंकर चव्हाण रा. पिंपळगांव कोलते भोकरदन जि. जालना. येथील राहीवासी असून अर्जदार यांनी या कार्यालयास त्यांचा स्वतः चा/मुलाचा/मुलगी स्वराज गजानन चव्हाण यांचा जन्म दिनांक २४.०४.२०२३ मौजे पिंपळगांव कोलते येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुरंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणे साठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधीत प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**भोंकरदन**











जालना शहरात माहेश्वरी समाजाच्या वतीने महेश नवमी निमित्त शहरातील बडी सडक येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती याची सुरुवात बडी सडक येथील राम मंदिर पासून टांगा स्टॅन्ड, दाना बाजार, शोला चौक, नर नारायण मंदिर, बडी सडक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात असलेल्या महेश स्तंभ येथे समारोप करण्यात आले यावेळी समाजाचे महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. (छाया/ जावेद तांबोली)

# जालना जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा १ जुलै रोजी मुंबईत राज्यस्तरीय कृषि पुरस्कारांनी होणार गौरव

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत वर्ष २०२३ आणि २०२४ मधील विविध राज्यस्तरीय कृषि पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, जालना जिल्ह्यातील प्रयोगशील, नाविन्यपूर्ण आणि अभ्यासू शेतकऱ्यांनी या पुरस्कारांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्याच्या कृषि क्षेत्राचा गौरव वाढविणाऱ्या या गुणवंत शेतकऱ्यांचा भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम (एनएससीआय डोम), वरळी येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याला महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषि राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. कृषि सचिव परिमल सिंह आणि कृषि आयुक्त सूरज मांढरे यांचीही कार्यक्रमास विशेष उपस्थिती असणार आहे.

**पुरस्कारांच्या रकमेतील चौपट वाढ**

महाराष्ट्र शासनाने ७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृषि पुरस्कारांच्या रकमेतील मोठी वाढ केली आहे. नव्या धोरणानुसार पुरस्कारांच्या रकमांमध्ये जवळपास चौपट वाढ करण्यात आली असून, निवड झालेल्या शेतकऱ्यांना सन्मानचिन्ह, मानपत्र आणि वाढीव रोख रक्कम प्रदान करण्यात येणार आहे.यामध्ये वसंतराव नाईक कृषि भूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार आणि कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कारासाठी प्रत्येकी दोन लाख रुपये, युवा शेतकरी पुरस्कारासाठी एक लाख वीस हजार रुपये तर वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारासाठी ४४ हजार रुपये रोख रक्कम देण्यात येणार आहे. तसेच पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक पुरस्कार्थीस १५ हजार रुपये दैनिक व प्रवास भत्ता देण्यात येणार असल्याची माहिती कृषि विभागाने दिली आहे.

वर्ष २०२३ मधील जालना जिल्ह्याचे पुरस्कार विजेते वर्ष २०२३ साठी जालना जिल्ह्यातील चार शेतकऱ्यांची विविध पुरस्कारांसाठी निवड झाली आहे. परतूर तालुक्यातील रायपूर येथील अभयकुमार बाजीराव काळुके यांना प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक कृषि भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. बदनापूर तालुक्यातील वरुडी येथील जयकिशन रामदास शिंदे यांना कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार तर वाकुळणी येथील सोमनाथ सुधाकर अवघड यांना युवा शेतकरी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथील श्रीकांत बेलेश्वर आखाडे यांची वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारासाठी निवड झाली आहे. वर्ष २०२४ मधील पुरस्कार विजेते वर्ष २०२४ साठी अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील सौ. रंजना हनुमंतराव काळे यांना जिजामाता कृषिभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याच तालुक्यातील लालवाडी येथील गोवर्धन प्रभाकर उगले यांना कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अंबड तालुक्यातील आलमगाव येथील प्रल्हाद दत्तात्रय येळेकर यांची वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

जिल्ह्याच्या कृषि प्रगतीचा सन्मान

जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, पीकपद्धतीतील नवकल्पना आणि कृषी क्षेत्रातील सातत्यपूर्ण प्रयोगांच्या बळावर राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या पुरस्कारांमुळे जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळणार असून, कृषि क्षेत्रातील नवोपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल तसेच जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे यांनी सर्व पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाबद्दल गौरव व्यक्त केला आहे. जालना जिल्ह्याच्या कृषि वैभवात भर घालणाऱ्या या यशस्वी शेतकऱ्यांचा राज्यस्तरीय सन्मान हा संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# शेतकरी कर्जमाफी व गद्दार खासदारांची पैशाची भुक भागविण्यासाठी शिवसेनेच्या वतीने भीक मांगो आंदोलन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हा शिवसेनेच्या वतीने शेतकरी बांधवांना सरसगट कर्जमाफी,राम मंदिरातील दानपेटीतील दानचोरीया ज्वलंत मुद्यांसाठी व पैशासाठी गद्दार झालेल्या सहा खासदारांना निधी देण्यासाठी

प्रतित्माक भीम मांगो आंदोलन आज २४ जून रोजी सकाळी १० वाजता जालना बसस्थानक ते मामा चौक या दरम्यान करण्यात येणार आहे.

शिवसेना पक्षाने एवढे देऊनही हे खासदार पैश्याच्या हव्यासापोटी गद्दारी करून निघून गेले आहेत. त्याचा जाहीर निषेध करणार आहे. त्यांना मिळालेल्या

निधीचा पुरेपूर वापर न करता खोटे आरोप करून स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षातून निघून गेले आहेत. त्यांनी सर्व सामान्य मतदार व पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्यासोबत गद्दारी केली आहे. पक्षाने त्यांना एवढे देऊनही त्यांनी गद्दारी करणे कुणालाही पटलेल्या नाही. पैशाच्या हव्यासापोटी पक्षातुन निघून गेलेल्या खासदाराला भीक मागून शिवसैनिक पैसे देणार आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने शेतकरी बांधवाना सरसकट विना अटी शर्थीची कर्जमाफी देऊन त्यांचा सात बारा कोरा करावा.

यासाठी शिवसेना जालना जिल्ह्याच्या वतीने प्रतिकात्मक भिकमांगो आंदोलन करण्यात येणार आहे.

तरी सर्व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सकाळी १० वाजता जालना बस स्थानक येथे उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, महेश नळगे यांनी केले आहे. यावेळी जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, भगवान कदम, हनुमान धांडे, माधवराव कदम, परमेश्वर जगताप, रमेश गव्हाड, अशोक आघाव, महादेव काळे,महिला जिल्हा संघटक रूपम घुगे, युवासेना जिल्हा संघटक गणेश काळे, तालुकाप्रमुख कुंडलिक मुट्टे, दिनेश काकडे, जयप्रकाश चव्हाण, गणपत दराडे,बाळासाहेव गावडे,संदीप कंटूले, प्रदीप बोराडे, शहरप्रमुख दीपक रणनवरे, संदीप झारखंडे, महेश पुरोहित,शहर संघटक चेतन भुरेवाल, अल्पसंख्यांक शहरप्रमुख वाशिम खान, उपशहरप्रमुख डॉ.राजेश राऊत, संतोष क्षत्रिय यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, किसान सेना यासह शिवसेना अंगीकृत संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिकांची उपस्थित राहणार आहे.

# डॉ.सुभाषराव ढाकणे परिचर्या महाविद्यालयात योग दिन

**जालना - प्रतिनिधी**

रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे कॉलेज ऑफ बी.एस्सी नर्सिंग येथे जागतिक योगदिनानिमित्त योग शिबीर घेण्यात आले.योगश्री मनोज लोणकर यांनी योगासनांचे प्रशिक्षण दिले.



श्री.प्रदीप आमटे यांनी निरामय आरोग्यासाठी योगाचे महत्व सांगितले. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर व आयुष विभागाचे अधिकारी डॉ. कुलदीप तसेच मानोसोपचार तज्ज्ञ डॉ.प्रकाश आंबेकर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर,प्राचार्य डॉ. श्रीनाथ कुलकर्णी,प्रा.आशिष ढिल्पे, प्रा. बी एम नागरगोजे, प्रा. पुरुषोत्तम गायकवाड, प्रा. अक्षय खरे,प्रा.कोमल इंगोले, प्रा. सौरभ तांबे,प्रा.अतुल थोरात, प्रा.अनिकेत नागरे, प्रा.निकिता श्रीसुंदर, प्रा.मालिनी बत्तीसे, प्रा. राजकन्या कोरडे, प्रा. रिया सावळे, प्रा .ममता कांबळे आदी प्राध्यापक व ग्रंथपाल सौरभ बनछोड तसेच बी एस्सी नर्सिंग चे विद्यार्थी उपस्थित होते.

# समाज परिवर्तनात रोटरीचे महत्त्वपूर्ण योगदान–बारवाले

## रोटरी क्लब जालना मिडटाउनचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासह समाज परिवर्तनासाठी रोटरीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून, प्रत्येक रोटेरियनने सेवेचा हा वसा अखंडपणे जपावा आणि वाढवावा, असे प्रतिपादन महिकोचे चेअरमन राजेंद्र बारवाले यांनी केले.



रोटरी क्लब जालना मिडटाउनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा रविवार दि. २१ जून रोजी रुक्मिणी गार्डनमध्ये अत्यंत उत्साही आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला, त्याप्रसंगी श्री. बारवाले मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. प्रमुख पाहुणे रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल अमित कोरडे तर व्यासपीठावर नूतन अध्यक्ष अलोक नानावटी, सचिव मनमोहन भक्कड, मावळते अध्यक्ष अंकित अग्रवाल, मावळत्या सचिव राजनंदिनी राठौर यांची उपस्थिती होती. श्री. बारवाले पुढे म्हणाले की, तरुणांनी पुढे येऊन रोटरीच्या माध्यमातून समाजसेवेची धुरा आणि नेतृत्व आपल्या हाती घेणे हे अत्यंत भूषणावह आणि कौतुकास्पद आहे. आज आणखी दहा नवीन सदस्यांची भर पडल्याने ही संख्या १७४ वर पोहोचली आहे. मुंबईच्या बॉम्बे मिडटाउन क्लबपेक्षाही जालना मिडटाउनने सदस्य संख्येत घेतलेली झेप उल्लेखनीय आहे. मावळत्या टीमने राबवलेल्या रेटिनोपॅथी ऑफ प्रिमॅच्युरिटी या ग्लोबल ग्रँट प्रकल्पाचे श्री.बारवाले यांनी विशेष कौतुक केले. या उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये १ हजारपेक्षा जास्त मुदतपूर्व जन्मलेल्या बालकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली, तर ५० पेक्षा अधिक बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना कायमचे अंधत्व येण्यापासून वाचवले गेले. हा रोटरीचा समाजावर झालेला सर्वात मोठा सकारात्मक प्रभाव आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी क्लबचे मावळते अध्यक्ष अंकित अग्रवाल यांनी वर्षभरात राबवलेल्या उल्लेखनीय उपक्रमांची माहिती दिली. *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.